The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# तुकरमांचे परिस्थितीसापेक्ष व्यक्तिमत्त्व

सह. प्रा . मनिषा प्रकाश ठाकरे .
सह्याद्री शिक्षण सेवा मंडळ कला आणि वाणिज्य महाविद्यालय जूचंद्र , नायगाव (पूर्व).

भारताची भूमी ही निर्मळ भावनेची आणि श्रद्धेची आहे. निर्मळ भाव आणि अभंग निष्ठा यांच्या समन्वयातून भारताच्या भूमीत अनेक सात्त्विक प्रवाह निर्माण झाले. या सात्त्विक प्रवाहांनी, भक्तिपंथांनी भारताचे सांस्कृतिक जीवन समृद्ध केले. नाथ, दत्त, शैव, वैष्णव, वारकरी, रामदासी, पाञ्चरात्र, रामावत, वीरशैव, वल्लभ इत्यादी अनेक संप्रदायांनी भक्तीची, सदाचाराची, सहिष्णुतेची एक प्रचंड लाट या भूमीत निर्माण केली. त्या लाटेचे महासागरात रूपांतर झाले. भारतात आज पन्नास-पाऊणशे संप्रदाय असे आहेत की ज्यांना कोट्यवधी अनुयायी तर आहेतच, परंतु समाजाचे सत्त्व रहावे म्हणून हे सर्व संप्रदाय समाजात सद्गुणांच्या रोपणासाठी नित्य कार्यरत आहेत. भारताच्या सांस्कृतिक परंपरेत ज्यांचे महान योगदान झाले आहे त्यात महाराष्ट्रातील पंथांची कामगिरी पारमार्थिक दृष्ट्या फारच विलक्षण आणि ऐतिहासिकदृष्ट्या श्रेष्ठ आहे. महाराष्ट्रातील सर्व संप्रदायांमध्ये वारकरी संप्रदाय हा संख्येने निःसंशय मोठा आणि अत्यंत लोकप्रिय असा संप्रदाय आहे. वारकरी संप्रदाय असे नाव धारण केलेल्या या भक्तिपंथाचे मूळ स्वरूप हिंदु किंवा वैदिक धर्माचेच तत्त्वज्ञान प्रतिपादन करणारे आहे. वारकरी संप्रदायाचे भाग्य असे की ज्ञानेश्वरांसारख्या विभूतिमत्त्वाने याच भागवत धर्माला शिरोधार्य केले. नामदेव महाराजांनी वारकरी संप्रदायाची ध्वजा गंगा-सिंधूच्या खोऱ्यात नाचविली. एकनाथ महाराजांसारखा क्रांतदर्शं महात्मा या संप्रदायाला लाभला. समाजातील जातीभेद नाहीसे व्हावेत म्हणून नाथांनी जी क्रांती केली त्याला तोड नाही. आपल्या अभ्यासाने, चिकाटीने आणि श्रद्धेने नराचा नारायण होता येते हे तुकाराम महाराजांनी देहूसारख्या लहान गावात राहूनही सिद्ध केले. वारकरी संप्रदायाला फार फार उत्तुंग कर्तृत्त्वाचे संत परंपरेने लाभले. परिणामी वारकरी संप्रदायाची लोकप्रियता शिगेला पोहोचली. दत्त संप्रदायात आणि आणि नाथ संप्रदायातही असे महात्मे निर्माण झाले. परंतु त्या दोन्ही संप्रदायांची उपासना सामान्य जनांना दुर्बोधच राहिली. वारकरी संप्रदायाने मात्र गृहस्थाश्रमी माणसाला आत्मोद्धाराचा अत्यंत सुलभ मार्ग दाखविला. देहदंड न देता, कोणतीही कठोर उपासना न करता परमेश्वराला आत्मसात करण्याचा मध्यम मार्ग वारकरी संप्रदायाने स्वीकारला. ज्ञानेश्वर महाराज आणि त्यांची भावंडे नाथपंथी होती. एकनाथ महाराज दत्त सांप्रदायिकहोते शिवाय त्यांच्या घराण्यात सूर्याची उपासना होतीच. रामदासांच्या घराण्यात सुद्धा सूर्योपासना असल्याचे इतिहास सांगतो. असे असूनही या सर्वांना वारकरी संप्रदायाला अलिगन द्यावेसे वाटले. यातच त्या पंथाची थोरवी निःसंशय प्रस्थापित होते. अन्य कोणताही मार्ग न स्वीकारता सामान्यजनांच्या उद्धाराचा भक्तियुक्त मध्यम मार्ग हितकारक आहे, हे सर्व संतांनी जाणलेले होते. वारकरी संप्रदायाची प्रकृती समन्वयात्मक असल्यामुळेच वारकरी संप्रदाय रुजला, वाढला आणि लोकप्रियतेच्या कळसाला जाऊन पोहोचला. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील असला तरी त्याचे स्वरूप विश्वात्मक भावाचे आहे.

वारकरी संप्रदायतील साहित्यामध्ये तुकोबांच्या अभंगाला मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. तुकोबांचे अभंग त्यांच्या व्यक्तीगत जीवनानुभवातून जन्माला आलेले आहेत. त्यांच्या अभंगरचनेमधून प्रपंच करणारा तुकाराम संतपदापर्यंत कसा पोहोचला याचे प्रतिबिंब आढळते. त्यांच्या आत्मपर अभंगातून भावनेची उत्कटता, जीवनभाष्य, हळुवारपणा दिसतो. तर त्यांच्या उपदेशपर अभंगामध्ये परखडपणा आणि स्पष्टवक्तेपणा दिसतो. तुकोबांच्या प्रापंचिक जीवनातील सुख, समाधान त्यांच्या अभंगामध्ये व्यक्त झाले आहे. व्यापार, व्यवसाय, प्रपंचाची जबाबदारी नेटकेपणाने पार पाडणारे तुकोबा या टप्प्यावर दिसतात.

माता-पिता । बंधु सजन्ना ।
घरी उदंड धनधान्य ।। असे वर्णन तुकारामांनी केले आहे.

त्यानंतर तुकारामांच्या जीवनात संकटे आली. वयाच्या सतराव्या वर्षी आई- वडिलांचा मृत्यु झाला. त्यानंतर मोठी भावजय मरण पावली. या दुःखामुळे तुकारामांचे कामधंद्यात लक्ष लागत नव्हते. त्यामुळे व्यवसायात तुट आली. डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा राहिला. सतत सावकार दारी येऊ लागला अशावेळी भांबावलेले तुकाराम त्यांच्या अभंगामध्ये दिसतात

काय खावे आता कोणीकडे जावे ।
गावात रहावे कोण्या बळे ।।

याच कालखंडात महाराष्ट्रात दुष्काळाचे संकट आले. इ.स. १६३० मध्ये महाराष्ट्रात अन्नपाण्यावाचून माणसे आणि गुरे, ढोरे मरु लागली. या भयानक संकटामध्ये त्यांना

विती एवढे पोट
केवढा बोभाट तयाचा । याचे दर्शन घडले.

या दुष्काळामध्ये त्यांची पहिली बायको मृत्युमुखी पावली. पाठोपाठ मुलाचा मृत्यु झाला. केवळ चार वर्षांच्या कलावधीत आई-वडील, बायको, मुलगा ही कुटुंबातील जवळची माणसे दिवंगत झाली. संपत्ती आली आणि थोड्याच कालावधीत व्यवसाय बुडाला. संपत्ती, प्रतिष्ठा नष्ट झाली घरावर दारिद्रय पसरले. या काळात आणि तुकोबांना मानवी जीवन क्षणभंगुर आहे, त्याचप्रमाणे माणसाचे जीववित नश्वर आहे, याची जाणीव झाली. मानवी देह हे देवाचे धन आहे तिथे मनुष्यमात्राचे काही चालत नाही याची जाणीव त्यांना झाली.

सुख पाहता जवा पाडे ।
दुःख पर्वता एवढे ।।

हा अनुभव त्यांना या काळामध्ये आला. आपल्या पडत्या काळामध्ये कोणतेच नातेवाईक आपल्या मदतीस येत नाही याची ओळख त्यांना झाली.

दिल्या घेतल्याचे । अवघे सांगाती ।

याचा अनुभव त्यांना आला. तुकारामांना प्रपंचाची ही दुसरी बाजू पाहून वीट आला. त्यांना लोकांचा सहवास नकोसा झाला. दुष्काळामध्ये अन्न-पाण्यावाचून मरणारी माणसे पाहिल्यानंतर माणूस

किती अगतीक होतो तसेच माणसाच्या मर्यादा त्यांना समजल्या. दुष्काळामध्ये माणसामधील माणुसकी संपते याचे दर्शन झाले. त्यातून ते म्हणतात- 'मनुष्यधर्म मेला पांडुरंगा ।'

परमार्थाची वाटचाल

भक्तीमार्गाकडे वळल्यानंतर तुकोबांनी सुरुवातीला परंपरागत पद्धतीने विठ्ठलभक्ती केली. वारकरी संप्रदायातील नामस्मरण, पंढरीची वारी याप्रकारे त्यांनी भक्ती केली. त्यांच्या घराण्यात विठ्ठलभक्तीचा वारसा होता. मोडकळीस आलेले विठोबाचे देऊळ त्यांनी स्वतः कष्ट करून बांधून घेतले. त्यानंतर तुकारामांच्या मनातील निराशा, दुःख कमी झाले. लौकिक जीवनातील आपली यातना, चिंता, यांच्यापासून सुटका करून घेण्यासाठी तुकोबा विठ्ठलभक्तीकडे वळले. सुरुवातीच्या काळातील ही भक्ती जगावरचा आणि स्वतःवरचा भाग अधिक होता. कोणाचातरी आधार हवा म्हणून तुकोबा भक्तीमार्गाकडे वळले.

संघर्ष आणि साक्षात्कार

तुकारामाच्या जीवनातील भाबड्या भक्तीचा काळ संपला आणि तुकोबांचा स्वतःशी व बाह्य जगाशी संघर्ष सुरू झाला. या काळात तुकोबांना आपल्या मनात अजुनही संसाराबद्दलचे विचार येतात, आपल्याला हरीभक्त म्हणून लोक ओळखतात पण प्रत्यक्ष विठ्ठलाची भेट झाली नाही या उणीवा त्यांना जाणवल्या. त्याचबरोबर परमेश्वाचे स्वरुप कसे आहे? शाश्वत काय आहे? याचा ध्यास त्यांना लागला. प्रपंच सोडून परमार्थाकडे बळला म्हणून लोक 'पोट पोसा' अशी निंदा करू लागले. प्रपंच करणे जमले नाहीच आता परमार्थ साधेल का? अशी शंका त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली. यापैकी काहीच साधले नाही तर काय होईल? असाही प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाला. तुकारामांच्या

रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग ।

या अभंगातून त्यांच्या मनातील त्याचप्रमाणे बाह्य जगाशी चाललेला संघर्ष स्पष्ट होतो. कालांतराने त्यांना माणसाचे मन हेच गुरु आणि शिष्य आहे हे समजले. मनाच्या सामर्थ्यावरच माणसाची उन्नती अवलंबून आहे. जोपर्यंत मन शुद्ध नाही, मनावर ताबा मिळवता येत नाही तोपर्यंत मोक्ष, विठ्ठल भेट या गोष्टी फोल (निरर्थक) आहेत याची जाणीव त्यांना झाली. परमेश्वराजवळ मोक्षाचे गाठोडे नाही, आपणच प्रयत्नपूर्वक मोक्ष मिळवला पाहिजे. त्यासाठी चांगले आणि वाईट याची पारख करून मनावर संस्कार केले पाहिजेत. ही निवड करत असताना स्वतःचे मन आणि बुद्धी यांना प्रमाण मानून सत्य काय? हे शोधले पाहिजे याची जाणीव त्यांना झाली.

सत्य असत्याशी मन केले ग्वाही ।
मानियले नाही बहुमता ।।

या अभंगामध्ये मनाचे सामर्थ्य त्यांनी सांगितले आहे. भक्ती करण्यासाठी मन हे निकोप, निर्मळ, असले पाहिजे हे या काळात तुकारामांना जाणवले. त्यासाठी सतत कठोर आत्मपरिक्षण त्यांनी केले. क्षणाक्षणाला मनात येणारे नवे विचार, अस्थिर मन, मनातील उदासीनता, स्वतःमधील अपुर्णता या सर्वांवर त्यांनी प्रयत्नपूर्वक विजय मिळवला. त्यांच्या मनातील संघर्ष त्यांच्या अभंगामध्ये व्यक्त होतो.

'ओस झाल्या दिशा मज वाटे भिंगुळ वाण' या अभंगामध्ये दिसते-

कन्या सासुरासि जाये । मागे परतोनी पाहे ।
तैसे झाले माझ्या जीवा । कधी भेटसी केशवा ।।

या सर्व अभंगामध्ये तुकारामाला विठ्ठलभेटीसाठी लागलेली आस, तळमळ, व्याकुळता व्यक्त होते. याच काळात हरीभक्ती ही सुळावरची पोळी आहे. त्यासाठी खडतर प्रयत्न केले पाहिजे हे त्यांना समजते.

विठ्ठलभेटीसाठी तळमळणारे तुकाराम विठ्ठलाशी वेगवेगळ्या नात्याने बोलताना कधी ते स्वत:कडे कमीपणाने बोलतात, "मी अवगुणी करवंटा आहे, तु श्रेष्ठ आहेत म्हणून तू मला भेट दे अशी विनंती करतात." कधी ते विठ्ठलाशी भांडतात. त्याला चोरटा, भारवाही अशाही शिव्या देतात.

आम्ही गांजी जन । तरी का मेला नारायण ।

आपल्या मनाचा खंबीरपणा आपणच टिकवून ठेवला पाहिजे. आपली निष्ठा प्रामाणिक असेल तर परिणामांचा विचार न करता प्रयत्न चालूच ठेवले पाहिजेत असा निश्चय तुकोबांनी केला. त्यांच्या या निश्चयाला कालांतराने यश मिळाले आणि विठ्ठलाची भेट झाली. देव आणि भक्त यांच्या भेटीनंतरचा आनंद त्यांनी आपल्या अभंगांमधून व्यक्त केला आहे.

१) आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदाची अंग आनंदाचे ।
२) जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ।
३) अणूरणीचा थोकडा । तुका आकाशा एवढा ।

या अभंगांमधून तुकोबांनी विठ्ठल भेटीचा आनंद व्यक्त केला आहे. तुकाराम समाजात राहून सर्वसामान्य माणसांना उपदेश करू लागले. तुकारामाच्या अभंगामधून त्यांच्या जीवनातील प्रसंग त्यांचा विकास स्पष्ट दिसतो.

तुकारामांनी समाजातील सर्वसामान्य माणसाला उपदेश केला. हा उपदेश कोरडा उपदेश नव्हता. त्यांना स्वतःच्या अनुभवातून समजलेले जाणवलेले माणसामधील दोष त्यांनी अभंगामधून दाखवले. सर्वसामान्य माणसाचं मन, विचार, शुद्ध आणि चांगले असले पाहिजे यावर त्यांनी भर दिला. सामाजाचा विकास, माणसाची दुःख कमी झाली पाहिजेत या जाणीवेतून त्यांनी अभंगरचना केली. सामान्य माणसाने ससारामध्ये गुंतून राहू नये असा उपदेश त्यांनी केला. संसार करत असताना विठ्ठलभक्ती सहज शक्य आहे हे त्यांनी सांगितले. भक्तीसाठी त्याग केला पाहिजे अशा प्रकारचा उपदेश त्यांनी केला नाही.

जोडुनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करा ।

संसार करत असताना धन, संपत्ती असावीच लागते हे सर्व उत्तम व्यवहारातून मिळवावे. आणि तो खर्च करत असताना त्या पैशामध्ये गुंतू राहू नये. त्या सर्वांवर आपली मालकी आहे असं समजून सतत पैश्याचा विचार करू नये असा उपदेश त्यांनी सांगितला आहे. उत्तम मार्गाने पैसा मिळवले व उपजिविकेकरता तो याग्य पद्धतीने खर्च करावा हा उपदेश त्यांना सर्वसामान्यांना करायचा होता.

संसारामध्ये गुंतणे त्याचा मोह धरणे म्हणजे ढेकणाच्या बाजेवर शांत झोपेची • अपेक्षा करण्या इतकेच चुकीचे आहे. कारण संसारात दु:ख अधिक आहे. आयुष्यभर मिळवलेले धन अखेरीस त्यातली कुठलीच गोष्ट आपल्या बरोबर येत नाही यामुळे पैसा, संसार यामध्ये जास्त गुंतुन राहू नये.तुकोबांच्या उपदेशपर अभंगांमधून लोकस्वभावाचे दर्शन घडते. प्रपंच करत असताना लोक दोन्हीकडून बोलतात. संसार केला तर हा पसारा आहे असे म्हणतात आणि त्याचा त्याग केला तर आळशी आहे असेही म्हणतात. निंदा करणे हा लोकांचा स्वभाव असतो याचा उल्लेख त्यांनी केला आहे.

संसाराची आसक्ती सोडून विठ्ठलभक्ती करावी असा उपदेश त्यांनी केला आहे. सर्वसामान्य माणसाला सगुण, साकार भक्तीमय आहे हे ओळखून त्यांनी विठ्ठलाच्या मुर्तीचे वर्णन केले. पंढरीची वारी केल्यानंतर जन्मांतरीची पापं नाहीशी होतात. सर्व सामान्य माणसाला संसारातील दु:ख, कष्ट यांच्यावर मात करण्यासाठी विठ्ठलाची भक्ती हा सोपा उपाय आहे. त्यासाठी किर्तन आणि नामस्मरण करावे. भक्ती करत असताना शुद्ध मन हे आवश्यक आहे. त्यांच्यामते विठ्ठल मंदिरामध्ये नाही तो लोकांमध्येच आहे. आणि तो मिळवण्यासाठी संसार सोडावा लागत नाही. सन्यास घ्यावा लागत नाही. शुद्ध मनाने भक्ती केल्यास तुमच्या जवळच विठ्ठल आहे असे दिसते संत तुकाराम म्हणतात.

तुकोबांनी समाज जागृतीसाठी आणि भक्तीचा प्रसार करण्यासाठी कीर्तन हे माध्यम निवडले. त्यांनी रचलेले अभंग कीर्तनामधून लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. तुकारामांच्या टीकापर अभंगामध्ये समाजातील जातीभेद, अंधश्रद्धा यांच्यावर कडाडून हल्ला केल्याचे दिसते. भक्ती करत असताना जात, वर्ण, कुळ हे उपयोगाचे नाही. गुणी माणसाच्या ठिकाणी देव असतो. भक्ती करण्यासाठी मनाने निर्मळ, वाचेने रसाळ असणे आवश्यक आहे. गंध, टिळा, रुद्राक्षांच्या माळा यांची गरज नाही. आचरण आणि अंतःकरण शुद्ध असावे याच्यावर तुकाराम महाराजांनी भर दिला. धर्म म्हणजे पाखंड, ढोंगीपणा, कर्मठपणा नाहीसा करणे असे त्यांनी सांगितले.

वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठाव ।
थोरांनी वहावा भार माथा ।

हा अभंग त्यांनी अनुभवातून लिहिला. जो शुद्ध मनाने भक्ती करतो त्याला वेदांचा अर्थ सांगण्याची गरज नसते. कारण त्याला तो अनुभवामधूनच कळतो. भक्ती आणि धर्म यांच्या नावाखाली चमत्कार करणारे भोंदू गुरु, चिलीम ओढणारे गोसावी, नवस करायला लावणारे ढोंगी गुरु यांच्यावर तुकोबांनी टीका केली. समाजातल्या ढोंगीपणावर टीका करताना-

देवावरि विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।
तेथे पैजारेचे काम ।
अधमासि जो अधम ।

या अभंगांमधून (अधमाला) दुष्ट माणसाला जशाच तसे उत्तर दिले पाहीजे असे त्यांनी सांगितले. डोळस भक्ती म्हणजे समाजातील दृष्ट माणसांचे निदलंदन करणे.

तुकारामांनी अतिशय कमीत कमी शब्दांमध्ये अभंग लिहिले आहेत.

उदा. १) माले घातले रडाया । नाही आसू नाही माया ।

२) तुका म्हणे तोची संत । सोशी जनाते आघात।

या छोट्या रचनांमधून मानवी जीवनांबद्दल भक्तीपर उपदेश केला. कमीत कमी शब्दात मोठा आशय मांडणे हे त्यांच्या भाषेचे वैशिष्ट्य आहे. तत्कालीन समाजातील रुढी, परंपरा, समाजाची भाषा या सर्वांमधून त्यांनी अभंगरचना केली. समाजावर टीका करत असताना उपहास, उपरोध यांचा उपयोग केला. माणसांचे मन, बोलणे, चालणे, त्यातील ढोंगीपणा त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे मांडला.

लोकव्यव्हाराचे बारीक निरीक्षण , मनुष्यस्वभावाचे सूक्ष्म ज्ञान , जबरदस्त आत्मविश्वास व तडफदार वृत्ती हे निष्ठावंत समाजसुधारकाचे गुणविशेष तुकारामांच्या ठिकाणी होते . भावनेच्या हळुवारपणापेक्षा विचारांचा सकसपणा संत तुकारामांत अधिक मानवते. स्वानुभवाच्या बोलावरच तिची सारी भिस्त आहे . म्हणूनच तत्त्वज्ञान, भक्ति , आचार यांना व्यापक नितीमूल्यांची सामाजिक बैठक मिळऊन देण्याला त्यांची अभंगवणी समर्थ ठरते .

संदर्भ

1 . ह . श्री . शेणोलीकर , प्राचीन मराठी स्वरूप, डायमंड पब्लिकेशन्स
2 डॉ. शंकर अभ्यंकर , वारकरी संतांचा भक्तियोग (खंड ५)